

देगलूर : देगलूर महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा घेण्यात आली.

# देगलूर महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा

देगलूर : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांच्या (एनईपी) अंमलबजावणीसाठी प्राध्यापकांची, विद्यार्थी तसेच संचालकाची मानसिकता सकारात्मक पद्धतीने बदलावी लागणार आहे. शिक्षणाचा केंद्रबिंदू असलेल्या विद्यार्थ्यांनी या धोरणाचा आग्रह धरला पाहिजे, असे मत पीपल्स महाविद्यालयातील इग्रंजी विषयाचे प्रा. डॉ. डी.एन. मोरे यांनी व्यक्त केले. देगलूर महाविद्यालयात आयक्यूएसी विभागातर्फे नविन शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर आयोजीत एक दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मोहन खताळ होते. वक्ते महात्मा गांधी आतंरराष्ट्रीय विद्यापीठ वर्धा येथिल प्रा.डॉ. बालाजी चिरडे होते. प्रा. विनय भोगले यांनी सूत्रसंचालन केले. तर आरती बामणे हिने आभार मानले. या वेळी उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, नोडल अधिकारी डॉ. सर्जेराव रणखांब, डॉ. लक्ष्मणकुमार सुदाम, अधीक्षक गोविंद जोशी, मनोज साखरे यांच्यासह आदी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner